

संजय हडकर

# गिरगावकरांना 'डबल'ची लॉटरी

## 'मेट्रो'बाधितांना मिळणार दुप्पट क्षेत्रफळाची घरे, मुख्यमंत्र्यांची घोषणा

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या दरम्यानच्या मेट्रो तीन प्रकल्पामुळे मुंबईतील गिरगाव आणि काळबादेवीतील २० इमारतींमधील ७७७ कुटुंबे बाधित होणार आहेत. त्यांचे त्याचजागी पुनर्वसन करण्यात येईल. तसेच त्यांना त्यांच्या सध्याच्या घरांच्या दुप्पट क्षेत्रफळाचे घर देण्यात येईल, तसेच प्रकल्प पूर्ण होईपर्यंत त्याच परिसरातील म्हाडाची घरे त्यांना तात्पुरती राहण्यासाठी देण्यात येतील, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत केली.

मेट्रो तीन प्रकल्पामुळे अनेक झोपड्या आणि इमारती पाडाव्या लागणार असल्याने शिवसेना, मनसे या पक्षांनी या प्रकल्पाला विरोध केला आहे. त्यामुळे सोमवारी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन केले. मेट्रो तीन प्रकल्पामुळे गिरगाव आणि काळबादेवी या परिसरातील २८ इमारतींमधील ७७७ कुटुंबे बाधित होणार आहेत. यात काळबादेवी येथील १८ इमारती तर गिरगावमधील १० इमारतींचा समावेश आहे. या इमारतींमधील कुटुंबांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याचे सरकारचे प्रयत्न आहेत. प्रकल्प बाधित होणाऱ्या ७७७ कुटुंबापैकी ८० टक्के कुटुंबांची सध्याची घरे ही ३०० चौ. फुटांपेक्षा छोटी आहेत. त्यांना दुप्पट क्षेत्रफळाची घरे दिली जातील. ज्यांची घरे ३०० चौ. फुटांपेक्षा मोठी आहेत त्यांना सुयोग्य असे क्षेत्रफळाचे घर दिले जाईल. मोठी घरे असलेल्यांना सध्याच्या घरांपेक्षा ३० टक्के अधिक क्षेत्रफळांची घरे देण्यात येतील, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

>> घरभाडे किंवा तात्पुरती सोय...५

### श्रेय भाजप सदस्यांना

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेट्रो तीनच्या प्रकल्प बाधितांना दुप्पट क्षेत्रफळाची घरे देण्याची घोषणा करताना, याबाबतची मागणी भाजपचे मंगलप्रभात लोढा, राज पुरोहित आणि मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी केली होती, असा उल्लेख केला. सत्तेत मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेच्या मागणीचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला नाही. इतरांच्या मागण्यांवर नंतर बैठक घेऊन ठरवू, असे उत्तर मुख्यमंत्र्यांनी दिले.

### १८ मार्चला गिरगाव बंद!

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गामुळे बाधित होणाऱ्या गिरगावमधील चाळींतील रहिवाशांचे पुनर्वसनासंदर्भात समाधान न झाल्यामुळे मेट्रो ३ मार्गाविरोधात १८ मार्चला गिरगाव बंदची हाक देण्यात आली आहे. सोमवारी 'चिराबाजार-गिरगाव-ग्रँटरोड रहिवासी बचाव कृती समिती'ने बंदची हाक दिली आहे.

>> सविस्तर वृत्त...५